सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१९

## अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी

मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१९ मध्ये लेखी परीक्षा, कागदपत्र पडताळणी, शारिरीक मोजमाप, मैदानी चाचणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी अंतरिम निवड यादीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांची यादी दि. ०५/०१/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर उमेदवारांची वैद्यकीय चाचणी/साक्षांकन नमुना याबाबतची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या पुरुष उमेदवारांची वैद्यकीय चाचणी दि. ०३/०२/२२ ते दि. १०/०२/२२ या कालवाधीमध्ये **नायगांव पोलीस मुख्यालय, पोलीस कल्याण संकुल, दादर (पू), मुंबई ४०० ०१४** येथे करण्यात येईल. उमेदवाराने त्यांना दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नमुद दिवशी सकाळी ०८:०० वा. न चुकता उपस्थित राहणे आवश्यक आहे. सदर बाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दिनांक | बैठक क्रमांक | लिंग | एकुण उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १ | ०३/०२/२०२२ | १०४०००१२८१ ते १८११०२२३४८ | पुरुष | १५० |
| २ | ०४/०२/२०२२ | १८५१०२३५८२ ते ३०७३०५५८५३ | पुरुष | २०० |
| ३ | ०५/०२/२०२२ | ३०७३०५६०५० ते ६२६९१०७३६० | पुरुष | २०० |
| ४ | ०८/०२/२०२२ | ६२६९१०७३९१ ते ६८३५१३६२२० | पुरुष | २०० |
| ५ | ०९/०२/२०२२ | १०१००००००६ ते ५८२८०८९८७३ | महिला | १६० |
| ६ | १०/०२/२०२२ | ५८२८०८९९३२ ते ६७४५१३०९५४ | महिला | १६६ |

वरील प्रमाणे वैद्यकीय तपासणी कार्यक्रम घेण्यात येणार असल्याने कोणत्याही उमेदवारास वैद्यकीय तपासणी दिनांक बदलुन मिळणार नाही.

१) वैद्यकीय चाचणीसाठी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. त्यासाठी उमेदवारास कोणताही प्रवास खर्च दिला जाणार नाही.

२) उमेदवाराने वैद्यकीय चाचणीच्या दिनांकास व वेळेस न चुकता उपस्थित राहणे आवश्यक आहे. **उमेदवार वैद्यकीय चाचणीसाठी अनुपस्थित राहिल्यास कोणतीही सूचना न देता त्याची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.**

३) वैद्यकीय चाचणीसाठी बोलविण्यात आले म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवु नये. उमेदवारास कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी, भरती निकषांची व अटींची पुर्तता अधिन राहुन उमेदवारांना वैद्यकीय चाचणीसाठी बोलविण्यात आले आहे. उमेदवार भरती निकषांची व अटींची पुर्तता करत नसल्याचे आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर त्यांना भरती प्रकियेतुन बाद करण्यात येईल. त्याबाबत उमेदवारास कोणताही दावा करण्याचा हक्क सांगता येणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

४) वैद्यकीय चाचणीच्या प्रक्रियेस हजर राहतेवेळी उमेदवारांनी कोरोना नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच मास्क लावुन व सॅनिटायझर सोबत घेवून यावे.

५) वैद्यकीय चाचणीसाठी येताना यापूर्वीचे मैदानी चाचणीचे प्रवेशपत्र सोबत आणावे, सदर प्रवेशपत्र नसल्यास, वैद्यकीय चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही. **तसेच चाचणीस हजर होताना ७२ तासांच्या कालावधीमधील 'RTPCR' तपासणी केलेबाबतचा शासकीय रुग्णालयाचा वैद्यकीय अहवाल आवश्यक**

**राहील. सदरचा अहवाल NEGATIVE असेल तरच प्रवेश देण्यात येईल, अहवाल POSITIVE असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.**

६) वैद्यकीय चाचणीस येताना अलीकडील कालावधीचे ०४ पासपोर्ट आकाराचे फोटो व सर्व मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे, फोटो आयडी व वैद्यकीय चाचणीचे प्रवेशपत्र न चुकता सोबत आणावीत. **तसेच मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे 30cmX41cm च्या (Cloth Coated) लिफाफ्यामध्ये बंद करुन पाकीटावर उमेदवाराने स्वत:चा तपशिल ठळक अक्षरात लिहावा. (संपूर्ण नांव, बैठक क्रमांक, छाती क्रमांक, निवड सुचीतील सामाजिक/समांतर आरक्षणासह अनुक्रमांक नमुद करणे आवश्यक राहील.)**

७) वैद्यकीय तपासणी 'महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१, व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, मुंबई यांच्या वेळोवेळीच्या आदेशांनुसार करण्यात येईल.

८) वैद्यकीय चाचणीत १) दृष्टीदोष, २) तिरळेपणा, ३) रातआंधळेपणा, ४) वर्णांधतेपणा, ५) गुडघ्यास गुडघा लागणे, ६) सपाट तळवे, ७) त्वचा रोग, ८) छातीचे रोग, ९) तोतरेपणा या चाचण्यांचा समावेश असुन या चाचण्यांमध्ये दोष आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

९) वैद्यकीय चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना साक्षांकन नमुना देण्यात येईल. सदर साक्षांकन नमुन्यातील माहिती भरुन ०२ दिवसात या कार्यालयास मध्यवर्ती भरती कक्ष, नायगांव, दादर (पू), मुंबई- ४०० ०१४ येथे सादर करणे बंधनकारक राहील.

१०) साक्षांकन नमुन्यात भरुन दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास निवड रद्द करण्यात येईल. तसेच साक्षांकन नमुन्यामध्ये उमेदवाराने जन्मापासुन ते साक्षांकन नमुना भरुन देण्याच्या दिनांकापर्यंत ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य केलेले असेल त्याबाबतची माहिती, पुर्ण पत्ता, स्थानिक पोलीस ठाणेचे नांव इ. बाबतची माहिती नमुद करणे आवश्यक आहे. दिलेल्या ०२ दिवसाच्या विहित मुदतीत साक्षांकन नमुना सादर न केल्यास अथवा साक्षांकन नमुना परिपुर्ण माहितीसह सादर न केल्याचे आढळल्यास कोणतीही सुचना न देता निवड तात्काळ रद्द करण्यात येईल, याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

११) वैद्यकीय चाचणीत 'तात्पुरते अपात्र' ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस शल्यचिकित्सक यांच्या शिफारशीनुसार सर जे.जे. समूह रुग्णालयातील संबंधीत वैद्यकीय मंडळाकडे/विभागाकडे पुढील तपासणीसाठी पाठविण्यात येईल. याबाबत संबंधित उमेदवारास यथावकाश कळविण्यात येईल.

१२) वैद्यकीय चाचणीच्या वेळी उमेदवाराने कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१३) नियुक्ती प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय उमेदवारास बंधनकारक राहील.

१४) पोलीस शिपाई भरती प्रक्रियेंतर्गत वैद्यकीय चाचणी अथवा पुढील प्रक्रियेसंदर्भात कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांना ०२२-२४९५२०५० व (हेल्पनाईन नंबर) १०६२ या क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी.

१५) वैद्यकीय चाचणी अथवा पुढील प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवार सदर बाब संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या/वरिष्ठांच्या निदर्शनास आणुन देवू शकतील.

१६) पोलीस भरतीबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे उमेदवाराने काटोकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

COMMISSIONER OF POLICE

(शाम घुगे)

सदस्य, मुंबई पोलीस शिपाई भरती २०१९ समिती,